

# AVHAN BAHUDESHYA SANSTHA, AKOT

Presented by-
VARAD M
AKASH K

# About Avhan

- Registered under 1950 act.
- Registration No-904/07
- Est. Date-12/12/07
- Presided by- Mr Narendra Kakad.

# About Avhan...

- Society Registration Act 1866 No MH-90H/07
- Act 1950 No-F12/8H
- Office-
- Meherananda Colony,Akot Rd,Tq-Akot.

# Active Members-

- Urmila Kewat
- Sanghpal Vahurvagh
- Sumedh Khandare
- Prashant Bhatkar
- Deepak Abhyankar

# Events Organized by Avhan

- Bachat gat
- Mobile counselling
- Bapanchi shala
- Bal Sansad
- Free insurance for rickshaw wallas

# Events Organized by Avhan

- Panchagavya training
- Vidhwa Mahila Gaurav Samarambh
- Leadership infusion programme (for the disabled/blind)
- Women empowerment programme



# Future planning

- Family counselling center
- 2 Bal adhiweshans
- Vruddha Sammelan
- Home for aged
- Educational tours
- Community biogas plant
- Stop Migration



# Needs of Avhan

- Funding for educational tours
- Rugna Wahika (Doctor at home)
- Counselling centers in every village
- Library for children
- Funds for linkage dairies
- Expert guidance for panchgavya training

# Avhan active Centers

Avhan is active in-

- Popatkhed
- Rudadi
- Chichpani
- Vastapur
- Januna
- Koha-Kund
- Bori

# Why should we fund the NGO?

- All active members work voluntarily
- People are paid as per projects.
- Documents related to tax free CSR are in process
- All other legal documents are ready

# People affected

- 40 women helped under Daal mill.
- Bachat gat provided training in handgloves production.
- 400 women are now financially secure.
- Linkage dairies established in 10 villages.
- 50 women became financially stable in this plan.
- 20 Bachat gats established who helped 200 women and provided proper local markets.

# Linkage dairy



# Bal Sansad



## आदिवासी गावात नांदतेय लोकशाही

### वस्तापूर, जनुना, कुंड गावात 'बालसंसद'

**राजू चिमणकर**
दि. २९ (अकोला)

आदिवासी दुर्गम गावांमध्ये शिक्षणाची गंगा पोहोचली खरी, मात्र साक्षरतेचे प्रमाण अद्यापही अत्यल्पच आहे. त्यामुळे त्या भागातील लोकांना हक्क, अधिकारांची जाणीव नाही. यासाठी बालकांना एकत्र करून त्यांना लोकशाहीचे धडे देण्यासाठी आकोटातील सामाजिक कार्यकर्ता नरेंद्र काकड या युवकाने पुढाकार घेतला आहे. आदिवासी गावांमध्ये 'बालसंसद'च्या माध्यमातून लोकशाही नांदत आहे.

सातपुड्याच्या कुशीत वसलेली गावे तशीही दुर्लक्षितच. त्यांना विकासाचा सूर्य अजूनही गवसला नाही. जिथे योजनांचीच माहितीच नाही, तिथे हक्क अधिकारांचे काय, असा प्रश्न उपस्थित होतो. हाच प्रश्न नरेंद्र काकडला भेडसावत होता. शेवटी त्याला उत्तर मिळाले. वडीलधारी लोक बालकांचे ऐकतात. प्रसंगी त्यांचे अनुकरणही करतात. म्हणून इयत्ता तिसरी ते दहावीपर्यंतच्या मुला-मुलींना विचारांनी प्रेरित करून त्यांची 'बालसंसद' तयार केली. वेगवेगळ्या गटांची निर्मिती करून त्यांच्यात वैचारिक मंथन होते. गावातील समस्या सरपंच, पोलिस पाटील, शिक्षक यांच्या समन्वय समितीसमोर बालसंसदेचे प्रतिनिधी मांडतात. त्या समस्या ग्रामसभेत मांडल्या जातात. प्रतिनिधींची निवड प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीनेच होते. नवनियुक्त प्रतिनिधींना स्वच्छता समिती, पाणीपुरवठा, आरोग्य, ग्रामविकास, शिक्षण अशी वेगवेगळी खाती दिली जातात. यामध्ये ५० टक्के मुलींचा सहभाग असतं बालसंसदेची वर्षातून दोन अधिवेश तालुक्याच्या ठिकाणी घेतल्या जाण आहेत.

गावातील सुशिक्षित बांध प्रतिनिधींना प्रशिक्षित करण्याचे का करतात. शासनावर टीका करण्यापेक्ष कर्तव्ये पार पाडून शासनाला सहका करा, हाच या उपक्रमाचा प्रामाणिक उद्देश असल्याचे चेतना संस्थेचं सामाजिक कार्यकर्ते प्रदीप कोरडे राहुल बोळे, विजय डिक्कर, किशो कुकडे यांनी सांगितले.

वस्तापूरच्या बालसंसदेत सहभागी बालक.

### शिवदास बनला पंतप्रधान

बालसंसदेत नवनियुक्त प्रतिनिधींमधून निर्णयक्षमता असलेल्या बालकाला पंतप्रधान बनविले जाते. वस्तापूर येथील शिवदास गवते याला पंतप्रधान म्हणून निवडण्यात आले, तर उपपंतप्रधानपदी धनराज कासदेची निवड करण्यात आली. नागेश्वर खोटे, आकांक्षा ढिगर, अश्विनी खोटे, लोकेश खोटे, योगेश कासदे यांच्याकडे क्रीडा, बालकल्याण, पाणीपुरवठा, स्वच्छता, शालेय, पर्यावरण संरक्षण आदी खाती सोपविण्यात आली आहेत. जनुना व कुंड गावात बालसंसद कार्यरत असून, लवकरच विविध गावांमध्ये स्थापन करण्यात येणार आहे.

> "नागरिकांना मताचा अधिका आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजवर बालकांना मत, विचार व्यक्त करण्याचा अधिकार मिळाला नाही. त्यांच्या माध्यमातून देश विकासाला हातभार लावल्या जाऊ शकतो. त्यांचाही विचार व्हायला हवा. बालसंसदेच्या माध्यमातून बालपिढीचे सशक्त माध्यम तयार व्हावे, हीच माझी तळमळ आहे, ते आव्हान पेलण्यास बालकही सक्षम आहेत.
>
> -नरेंद्र काकड
> सामाजिक कार्यकत

# People affected...

Under  Bal Sansad

70 children in 7 villages take active part in governance

# People affected…

- Through Mobile counselling-
- Avhan reached 300 families.
- Women started attending Gramsabha.
- Via Leadership programmes-
- Sabhapati at Popatkhed and Up-Sabhapati at Vastapur elected are women

# People affected…

- Womens right to property-
- 300 women registered on 7-12 dakhla.

# Under Rehabilitation Programmes

१४ वर्षांपासून शेतीची मालकी नाही : कृषी योजनांपासून वंचित

## व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसित शेतकऱ्यांचा वनवास!

विजय शिंदे • अकोट

व्याघ्र प्रकल्पामुळे मेळघाट अभयारण्यामधून आकोट तालुक्यातील पुनर्वसित झालेल्या कोहा, कुंड, बोरी या गावातील आदिवासी शेतकऱ्यांना गत १४ वर्षांपासून अद्यापही शेतीची मालकी देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांपासून वंचित रहावे लागत आहे. या गंभीर प्रकाराकडे शासन व लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असल्याने पुनर्वसित शेतकऱ्यांचा वनवास कधी संपणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अमरावती जिल्ह्यातून कोहा, कुंड, बोरी या गावाचे पुनर्वसन सन २००१-०२ मध्ये अकोला जिल्ह्यातील आकोट तालुक्यात करण्यात आले. पुनर्वसनामुळे शेकडो आदिवासी कुंटुबांनी आपली मालकीची शेतजमीन व्याघ्र प्रकल्पाला दिली; परंतु त्यांना अद्यापही घराव्यतिरिक्त फक्त भोगवटदार वर्ग-२ म्हणून वहितीकरिता जमीन देण्यात आली, मात्र या जमिनीची मालकी शासनाकडे आहे. त्यामुळे जमिनीचे वहिवाटदार एवढीच ओळख या शेतकऱ्यांची आहे. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्ती पुनर्वसन अधिनियमनुसार वहितीकरिता वाटप झालेली शेतजमिनीच्या ७-१२ वर



लोकमत विशेष

भोगवटदार यांचे नाव येत असते, तर वाटप झालेल्या दिनांकापासून १० वर्षांनी त्या जमिनी ११ जून २००४ च्या शासन निर्णयानुसार वहीवाट वर्ग-१ म्हणजे मालकीच्या करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तरीसुद्धा शासनाने अद्यापही ही शेतजमीन पुनर्वसित शेतकऱ्यांचे नावाने केली नाही. ही परिस्थिती अधोरेखित होत असताना कृषी समृद्धी समन्वयित कृषी प्रकल्पाच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र सुभाष काकड (आकोट) यांनी पुढाकार घेऊन या विषयी उपविभागीय अधिकारी आकोट यांना पत्रव्यवहार केला. त्यानंतर उपविभागीय अधिकारी आकोट यांनी शेतजमिनीची मालकी देण्याच्या दृष्टीने उपवनसंरक्षक वन्यजीव विभाग आकोट यांना पत्र लिहून दस्तऐवजाची माहिती मागण्याला एक वर्ष उलटून जात आहे.

पुनर्वसन हे अमरावती जिल्ह्यातील असल्यामुळे आकोट उपवनसंरक्षक यांनी गुगामल वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक यांना माहिती पुरविण्यासंदर्भात पत्र दिले, तर गुगामलचे उपवनसंरक्षक यांनी तहसीलदार चिखलदरा यांना फेब्रुवारी २०१४ ला पत्र देऊन पुनर्वसिताची यादी मागविली; परंतु पत्रव्यवहाराचा हा प्रवास अजूनही सुरु असून, अद्यापही पुनर्वसित शेतकऱ्यांची यादी आकोट उपविभागाला मिळालेली नाही. मात्र पुनर्वसित शेतकरी हे आकोट तालुक्यात भोगवटदार वर्ग-२ म्हणून वहिती आहे; परंतु त्यांच्याकडे जमिनीची मालकी नसल्याने शासनाचे कृषीविषयक योजना व बँकाचे कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे शेतमालकीकरिता भोगवटदार वर्ग-१ म्हणून आपली नावे येण्याकरिता १४ वर्षांचा संघर्ष आदिवासीबहुल असलेल्या कोहा, कुंड, बोरीमध्ये चालला आहे. शासनाच्या विविध योजना य आदिवासी ग्रामस्थांपर्यंत पोहोचाव्यात हे शासनाचे धोरण असतानादेखील आदिवासी त्यांच्या हक्कापासून वंचि असल्याचे चित्र निर्माण झाल्या लक्षात येते.

"सामाजिक कार्यकर्ते पुनर्वसित शेतकरी हे पूर्वी भोगवटदार वर्ग-१ होते की भोगवटदार वर्ग-२ ही माहिती व यादी उपवनसंरक्षक मेळघाट प्रकल्प यांना मागितली आहे; परंतु अद्याप माहिती पुरविण्यात आली नाही. माझ्याकडे माहिती आल्यावर मालकी देण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करणार.

- शैलेश हिंगे
उपविभागीय अधिकारी आकोट

"शासनाने वहिवाट २ ची जमीन १ मध्ये करावी. जेणेकरून शासकीय योजनांचा लाभ आदिवासी ग्रामस्थांना होईल व व्यवहारातील त्यांच्या अडचणी दूर होतील. तसेच जमिनीची मालकी त्यांना मिळावी. तेव्हा ते स्वत:चा विकास करु शकतील.

- सुरेश कासदेकर
सरपंच ग्रा.पं. कोहा (पुनर्वसित)

"कोहा, कुंड, बोरी हे पुनर्वसित गावे असून, १३ वर्षांपासून ते वहिवाट वर्ग २ मध्ये त्यांची जमीन आहे. ती वहिवाट वर्ग १ मध्ये यावी. तसेच जमिनीची मालकी त्यांना मिळावी, यासाठी शासन स्तरावर निवेदने तसेच पाठपुरावा आम्ही केला आहे. शासनाने सहकार्य करून जमीन मालकीपासून ग्रामस्थांना वंचित न ठेवता तत्काळ शेतजमीन त्यांच्या नावावर करावी, तसा शासन निर्णयदेखील आहे.

- नरेंद्र सुभाष काकड
सामाजिक कार्यकर्ते आकोट

“Thank you!”